# दिनांक 07/03/2025

1 वडखळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 05/03/2025 रोजी 19:30 वा च्या सुमारास मौजे वाशी नाका ते वढाव गावाकडे जाणारे रोडवर सेरीमा हॉटेलच्या मागे एक किमी अंतरावर ता.पेण येथे फिर्यादी व त्याचा भाउ असे दोघे त्यांचे टीव्हीएस कंपनीची स्पोर्ट मोटार सायकल क्र. एमएच 06 सीई 0135 हीवरून वढाव येथून उचेडे येथे जावून विटांचे तुकडे भरून ते त्यांचे गोदावरी नगर पेण येथील घराच्या कामाच्या ठिकाणी ठेवून ते पुन्हा त्यांचे वरील मोटार सायकलवरून वढाव येथील घरी येत असताना सेरीमा हॉटेलच्या मागे एक किमी अंतरावर वाशी नाका ते वढाव या रोडवर आलेवेळी सात ते आठ म्हशी अचानक रोडवर आल्याने यातील फिर्यादी यांचा भाउ याने म्हशींना मोटार सायकलची ठोकर लागू नये म्हणून मोटार सायकल रोडचे बाजूस घेतली असता त्यांचे मोटार सायकल समोर वाशी गावाकडून येणारी पॅशन प्रो मो. सायकल क्र. एमएच 06 बीजे 6606 ही वरील चालक आरोपीत व त्याचे पाठीमागे बसलेला असे भरधाव वेगात येवून रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून म्हशींना चुकवून त्यांची डावी बाजू सोडून उजव्या बाजूला रॉंग साईडला येवून फिर्यादी यांचे मोटार सायकलला समोरून ठोकर मारून अपघात करून फिर्यादी, आरोपी व साक्षीदार यांचे लहान मोठया स्वरूपाच्या दुखापतीस व दोन्ही मोटार सायकलचे नुकसानीस कारणीभूत झाला.

याबाबत वडखळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.12/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281,125(A),125(B) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.रणजित जाधव हे करीत आहेत

2. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 06/03/2025 रोजी 00:30 वा च्या सुमारास मौजे नाडा गावचे स्मशानभुमी शेड मध्ये प्रेत जाळण्याच्या ठिकाणी ता.पेण आरोपीत नं.01 ते 08 यांनी नाडा गावचे स्मशानभुमी शेडमध्ये प्रेत जाळण्याच्या ठिकाणी नारळ,लिंबु ,शंख,मानवी कवटी, ,अगरबत्ती पाकीट , डंबरु, पेटलेला नारळ,गोमुत्र ,भगवा कपडा व छोटे छोटे लाकडाच्या जुडी , हातातील नाडा , भस्माची डबी इत्यादी संधनाचा वापर करुन स्वतच्या फायदयाकरीता किंवा कोणाच्यातरी हानी करीता काहीतरी जादुटोणा अघोरी प्रथा केली म्हणुन तसेच थांबविण्याचा प्रयत्न केला असता नाडा गावातील गामस्थाचा अंगावर गाडी घालुन जीवे ठार मारण्याचा पयत्न केला. सदर गुन्ह्यातील 03आरोपीत यांना दिनांक 06/03/2025 रोजी 15:01 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत पेण पोलीस ठाणे येथे गु.र.नं.34/2025 भा.दं.वि.क.109, महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम 2013 चे कलम 3(1),2 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मसपोनि/श्रीम.अस्मिता पाटील हे करीत आहेत

3. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/03/2025 रोजी 19:30 वा ते दि. 03/03/2025 रोजी 19:30 वा च्या दरम्यान मौजे आंबेवाडी येथिल कुणाल नावच्या रिसॉर्ट आवारातुन ता.कर्जत येथे कुणाल रिसॉर्टच्या कम्पाउंड मधील पत्र्याच्या शेडमधील एकूण 40,000/-रुपये किमतीचा वॉटर फिल्टर हायप्रशेर पंप कोणीतरी अज्ञात चोर किंवा चोरटयांनी फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने ,स्वत:च्या फायदयाकरीता चोरून नेले.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.27/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/सचिन वाघमारे हे करीत आहेत.

4. महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 05/03/2025 रोजी 00:30 वा च्या सुमारास घर नं 1813, बालाजी मंदिर लगत छ.शिवाजी चौक ता.महाड येथे फिर्यादी यांची एकूण 1,50,000/-रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम मूददेमाल आरोपी रा.देवघर,पो,मांगरुळ ता-महाड फिर्यादी यांचे समंती शिवाय घरामध्ये प्रवेश करून एका रूम मधील एक कपाट तोडुन त्यामध्ये ठेवलेल्या दूस-या कपाटाची चावी घेवून त्या चावीच्या सहायाने दुसरे कपाट उघडुन कपाटातील सांन्याचे मंगळसुत्र व रोख रक्कम स्वतचे फायदया करीता घरुफोडी करून नेले. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 06/03/2025 रोजी 17:36 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत महाड शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.16/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 305, 331 (2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/गर्जे हे करीत आहेत.

5. रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/02/2025 रोजी 21:00 वा च्या सुमारास मौजे फियादी यांच्या किराणामालाच्या दुकानासमोर, वळके येथे ता.मुरुड येथे महिला फिर्यादी या नेहमी प्रमाणे त्यांच्या वळके गावातील किराण दुकान उघडले त्यानंतर खरेदी करण्या-यांचे येणे जाणे होत होते. त्यानंतर रात्री 09.00 वा. च्या सुमारास फिर्यादी दुकानात एकटया असताना आरोपी हा फिर्यादी हिच्या दुकाना बाहेर येवुन आरोपीत यानी फिर्यादीकडे तेलाची पिशवी मागितली फिर्यादी त्याला म्हणाल्या की तेलाची पिशवी नाही असे बोल्यावर आरोपीत याने फिर्यादीकडे पाहुन अश्लील हातवारे करुन त्यांना “तुला खुप दिवसापासुन विचारायचे होते, तु एकटी राहतेय तर तुझा नवरा कधी येतो. तु कशी काय राहतेस, तुला एकच मुल बस काय तुझी इच्छा काय आहे- तुझ्याकडे याचा पर्याय आहे, तुच मला देवु शकतेस.’’ असे अश्लीलपणे मला बोलुन माझेकडे लैंगीक संबंधाची मागणी करुन माझे मनास लज्जा उत्पन्न करुन माझ्याकडे बिभस्त व घाणेरडया नजरेने

माझ्या छातीकडे पाहुन व अश्लील हातवारे करुन माझ्या स्त्री मनास लज्जा उत्पन्न करुन सदर प्रकाराबाबत कोणास तु सांगितले तर याद राख गाठ माझ्याशी आहे. मी बघुन घेईन अशी धमकी दिली. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 06/03/2025 रोजी 23:22 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

यााबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.21/2025, भारतीय न्याय सहीता 2023 74,75(1)(2),79,351(2),प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोहवा/अनुष्का आशिष पुळेकर हे करीत आहेत.

6. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 06/03/2025 रोजी 19:30 वा च्या सुमारास मौजे अरवंद, ता.कर्जत येथे फिर्यादी यांचे शेजारी राहणारे साक्षीदार यांना फिर्यादी व त्यांचा भाउु पत्नी यांनी समजावुन सांगीतले कि,तुम्ही घरकुलाचे जे काम चालु केले आहे त्याची मागची भिंत तुमच्या जुन्या घराप्रमाणे बांधा भिंतीची हद्द वाढवू नका हद्द वाढविल्यास आम्हाला येण्याजाण्यासाठी रस्ता अपुरा पडेल असे फिर्यादी व साक्षीदार समजावुन सांगत असताना त्यावेळी तेथे हजर असलेला आरोपी हा फिर्यादी व साक्षीदार यांना म्हणाला कि,ही जागा माझ्या चुलत्याची आहे, तुम्हाला गाडीबैल जाण्यासाठी देखील रस्ता ठेवणार नाही असे म्हणुन आरोपीत याने सदर कारणावरुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी दमदाटी करुन त्याच्या हातातील दगडाने फिर्यादी यांचे डोक्याच्या उजव्या बाजुला मारहाण केल्यामुळे फिर्यादी यांना दुखापत झाली आहे.तसेच त्यावेळी फिर्यादी यांची पत्नी ही भांडण सोडविण्यासाठी गेल्या असता त्यांना देखील आरोपीत याने हाताबुक्यांनी मारहाण केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.61/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 118(1),115(2), 351(2)(3),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/अण्णासाहेब वडते हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 06.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 227 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,44,250/-रुपये इतका दंड आकारला आहे.